॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

Phone : (02462) 229574
Extension.No.143, 153

POST GRADUATION SECTION

Website: www.srtmun.ac.in
E-mail: dr.pg.srtmun@gmail.com

संदर्भ:पदव्युत्तर/आरक्षणईडब्लुएस/पेट २०२०/२०२०–२१/५७५    दि. ११/०५/२०२१

## परिपत्रक

**विषय: पेट २०२० परिक्षेकरिता अर्ज केलेल्या उमेदवारानी ईडब्लुएस प्रमाणपत्र सादर करणे बाबत.**

पेट परिक्षा २०२० मध्ये अर्ज करताना मराठा प्रवर्गातील विद्यार्थ्यांना एसईबीसी आरक्षणाचा रकाना नसल्यामुळे व न्यायालयीन प्रकरण असल्यामुळे या आरक्षणाचा फायदा झालेला नाही. तसेच शासन निर्णय दि. २६ डिंसेबर २०२० च्या आदेशान्वये मराठा प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ईडब्लुएस आरक्षण लागु करण्यात आलेले असल्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी खुल्या प्रवर्गातुन पेट परिक्षा दिली आणि ज्याच्याकडे ईडब्लुएस प्रमाणपत्र आहे अशा परिक्षार्थींना ईडब्लुएस नुसार पात्र ठरविण्याची मागणी विद्यार्थ्यांनी केली होती.

सबब या परिपत्रकान्वये मा. कुलगुरू महोदयाच्या आदेशान्वये सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, मराठा प्रवर्गातील सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास (एसईबीसी) वर्गातील उमेदवाराना सन २०२०–२१ या वर्षातील शैक्षणिक प्रवेश घेण्यासाठी व सरळसेवा भरती करिता आर्थिक दृष्टया दुर्बल घटकाचे (ईडब्लुएस) प्रमाणपत्र देण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार ज्या उमेदवारानी पेट २०२० परिक्षेकरिता खुल्या प्रवर्गातुन अर्ज सादर केलेले असतील व त्यानंतर ईडब्लुएस चे प्रमाणपत्र प्राप्त केलेले असेल व ते ईडब्लुएस च्या आरक्षणाचा लाभ घेउ इच्छित असतील तर अशा उमेदवारानी दि. २५/०५/२०२१ पर्यंत ईडब्लुएस प्रमाणपत्रासह dr.pg.srtmun@gmail.com या मेलआयडीवर ऑनलाईन अर्ज सादर करावेत. या अर्जात विद्यार्थ्यांचे नाव, विषय व बैठक क्रमाक नमुद करणे आवश्यक आहे. यानंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत यांची नोंद घ्यावी.

सहा. कुलसचिव
पदव्युत्तर विभाग

प्रत माहितीस्तव:

१. मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. प्र. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
३. मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ

Scanned with CamScanner